शिरवळकर

मा महासभा दि ०३/११/२०१६

# मा० विशेष महासभा

दि० ०३/१२/२०१६ स: ११:०० वा

प्रकरण क्र - ९३ ते ९९

६

१६/१७

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- २९/११/२०१६.

## मा. विशेष महासभा

**मा. विशेष महासभा सूचना क्रं. :- ०६, दिनांक २९/११/२०१६**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ------------------------------

नगरसेवक/नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा शनिवार दि. ०३/१२/२०१६ रोजी सकाळी १०.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०६, दि. २९/११/२०१६ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

**मा. विशेष महासभा सुचना क्रमांक ०६, दि. २९/११/२०१६ सोबतची विषय पत्रिका**
**सभा शनिवार दि. ०३/१२/२०१६**

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| ९३ | सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामधील मालमत्ता धारकांच्या मालमत्ता करातील व्याजाच्या रक्कमांना माफी देणेबाबत अभय योजना लागु करणे. |
| ९४ | महानगरपालिका क्षेत्रातील ज्या मालमत्तांना कर आकारणी झालेली नाही तसेच ज्या मालमत्तांचा वापर अनिवासी चालु आहे, अशा मालमत्तांची नव्याने वापराप्रमाणे कर आकारणी करणे इत्यादींसाठी अभय योजना लागु करणे. |
| ९५ | दहिसर पर्यंत येणाऱ्या मेट्रो रेल्वेचा विस्तार भाईंदर पर्यंत करणेबाबत. |
| ९६ | रस्ते, चौक, उद्याने व इतर वास्तुंना नावे देण्याबाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे. |
| ९७ | टेलिफोन बुथ, गटई स्टॉल यांचे धोरण ठरविणेबाबत. |
| ९८ | विशेष निधी अंतर्गत विकास कामांना मान्यता देणे. |
| ९९ | घनकचरा प्रकल्प संदर्भात NGT पूणे न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार ७० कोटी रुपये मा. विभागीय आयुक्तांकडे जमा करणेबाबत निर्णय घेणे. |

महानगरपालिका सचिव कार्यालय,
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- २९ नोव्हेंबर २०१६

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

मा. विशेष महासभा सुचना क्रमांक ०६, दि. २९/११/२०१६ सोबतची विषय पत्रिका
सभा शनिवार दि. ०३/१२/२०१६

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| ९३ | सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामधील मालमत्ता धारकांच्या मालमत्ता करातील व्याजाच्या रक्कमांना माफी देणेबाबत अभय योजना लागु करणे |
| ९४ | महानगरपालिका क्षेत्रातील ज्या मालमत्तांना कर आकारणी झालेली नाही तसेच ज्या मालमत्तांचा वापर अनिवासी चालु आहे, अशा मालमत्तांची नव्याने वापराप्रमाणे कर आकारणी करणे इत्यादीसाठी अभय योजना लागु करणे. |
| ९५ | दहिसर पर्यंत येणाऱ्या मेट्रो रेल्वेचा विस्तार भाईंदर पर्यंत करणेबाबत. |
| ९६ | रस्ते, चौक, उद्याने व इतर वास्तुंना नावे देण्याबाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे. |
| ९७ | टेलिफोन बुथ, गटई स्टॉल यांचे धोरण ठरविणेबाबत. |
| ९८ | विशेष निधी अंतर्गत विकास कामांना मान्यता देणे. |
| ९९ | घनकचरा प्रकल्प संदर्भात NGT पुणे न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार ७० कोटी रुपये मा. विभागीय आयुक्तांकडे जमा करणेबाबत निर्णय घेणे. |

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

महानगरपालिका सचिव कार्यालय.
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- २९ नोव्हेंबर २०१६

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि.०३/१२/ २०१६

### ।।गोषवारा।।

प्रकरण क्र.९३ : सन २०१६-१७ या आर्थिक वर्षातील मालमत्ता धारकांच्या मालमत्ता करातील व्याजाच्या (शास्ती, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कराधान नियम ४१ नुसार) रक्कमांना माफी देणेबाबत अभय योजना लागू करणे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कराधान नियम ४१ नुसार, पहिल्या सहामाही मालमत्ता कराची रक्कम बिल दिल्याच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या आत व दुस-या सहामाहिची मालमत्ता कराची रक्कम ३१ डिसेंबर पूर्वी भरावयाची आहे आणि जर अशी मालमत्ता कराची रक्कम त्या दिनांकापर्यंत असा कर भरावयाचा होता. त्या शेवटच्या दिनांकानंतर प्रत्येक महिन्यासाठी किंवा भागासाठी दरमहा २% इतकी रक्कम व्याज (शास्ती, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कराधान नियम ४१ नुसार) म्हणुन भरण्यास मिळकतधारक जबाबदार असेल अशी तरतूद करण्यात आली आहे. यानुसार महानगरपालिका क्षेत्रातील जे मिळकतधारक उपरोक्त नमूद केलेल्या विहित मुदतीत मालमत्ता कर महानगरपालिकेकडे जमा करीत नाहीत, अशा मिळकतधारकांकडुन दरमहा २% इतकी रक्कम व्याज (शास्ती, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कराधान नियम ४१ नुसार) आकारण्यात येत आहे. त्यानुसार अभय योजना अंतर्गत व्याज (महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कराधान नियम ४१ नुसार) माफीचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**प्रस्ताव –**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाची संगणकीय आज्ञावलीतील मागणीनुसार मालमत्ता करापोटी रु. २६५.५६/- कोटी मागणी दिसून येत आहे व सदर मागणीत रु.१४५.६३/- कोटी थकबाकी व रु. ६१.२९/- कोटी एवढे व्याज (शास्ती, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कराधान नियम ४१ नुसार) दिसून येत आहे. परंतू सदर मागणीत दुबार मागणी, प्रस्तावित निर्लेखित प्रकरणे यामुळे अवास्तव वाढ दिसून येत आहे.

सद्यस्थितीत विहीत मुदतीत मालमत्ता कराची रक्कम न भरणा-या मिळकत धारकास थकीत रकमेवर तरतूदीनुसार दरमहा २% प्रमाणे व्याज (शास्ती, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कराधान नियम ४१ नुसार) आकारण्यात येत आहे. काही मिळकतीचा वर्षानुवर्षे मालमत्ता कर भरला जात नसल्याने, त्यावरील व्याज (शास्ती, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कराधान नियम ४१ नुसार) वाढत आहे. यामुळे थकबाकी व व्याज (शास्ती, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कराधान नियम ४१ नुसार) यानुसार होणारी वसुलीची टक्केवारी कमी प्रमाणात दिसून येत आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनियम प्रकरण ८ (कराधान नियम) कलम ५१ नुसार मा.आयुक्तांस आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार नियम ४१ खालील शास्ती (व्याज-महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कराधान नियम ४१ नुसार) किंवा नियम ५० खालील फी किंवा वसुलीचा खर्च पुर्णत: किंवा अंशःत माफ करता येईल अशी तरतूद आहे. मालमत्ता कराच्या थकबाकीवरील व्याजामध्ये सुट दिल्यास, मालमत्ता कराची थकीत रक्कम व चालू मागणी भरण्याबाबत मिळकतधारकांचा/ नागरीकांचा कल आहे .अनेक मिळकतदार वर्षानुवर्षे मालमत्ता कराचा भरणा करीत नाहीत व त्यांना व्याज माफीची सवलत दिल्यास नियमितपणे मालमत्ता करांचा भरणा करणाऱ्या नागरिकांवर अन्याय होतो. वर्षानुवर्षे थकबाकी असल्याने विकासकामांना निधी अपुरा पडतो त्यामुळे थकीत रक्कम महापालिका फंडात जमा होणे आवश्यक आहे. त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कराधान नियम ५१ नुसार थकीत व्याज रक्कमेवर १० टक्के म्हणजेच अंदाजे ६ कोटी व्याज (शास्ती) (महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कराधान नियम ४१ नुसार) माफी दिल्यास अंदाजे

१४५ कोटी थकबाकी वसुली होत असल्यास सदर व्याज (महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कराधान नियम ४१ नुसार) माफी बाबतचा प्रस्ताव मा. महासभेसमोर सादर करण्यात येत आहे. तथापी १० टक्के पेक्षा जास्त व्याज (महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कराधान नियम ४१ नुसार) माफी देवू नये असे प्रशासनाचे मत आहे.

तरी,जे मिळकतधारक माहे १५ डिसेंबर २०१६ ते १४ जानेवारी २०१७ पर्यंत देय होणारा थकीत मालमत्ता कर व चालू आर्थिक वर्षाच्या मागणीसह रक्कम भरतील अशा मिळकतधारकांना त्यांच्या मिळकतीच्या मालमत्ता कराच्या देयकात दिसून येणाऱ्या व्याज रक्कमेचा (शास्ती, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कराधान नियम ४१ नुसार) १० टक्के रक्कम माफी करण्यात येईल.

उपरोक्तप्रमाणे जे मिळकतधारक दिनांक ३१ मार्च २०१७ पर्यंत मालमत्ता कराचा भरणा करणार नाहीत अशा मिळकतधारकांच्या सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या मालमत्ता कराच्या बिलामध्ये अशी व्याज (मालमत्ता कराच्या थकबाकीसह) थकबाकी म्हणून दर्शविण्यात येईल. सदरची थकबाकी वसुल करणेकरीता अधिनियमातील तरतूदीनुसार कडक कारवाई अंतर्गत प्रत्यक्ष वॉरंट बजावून मिळकत जप्त करण्यात येईल आणि जाहीर लिलावाद्वारे मिळकतीची विक्री करण्यात येईल.

उपरोक्तप्रमाणे मालमत्ता कर देयकातील व्याज (शास्ती, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कराधान नियम ४१ नुसार) १०% माफ़ करण्याबाबतचा प्रस्ताव मा.महासभेसमोर मान्यतेस्तव सादर.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि 02/12/16 वेळ 04:15
मा. स्थायी समिती / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. 64
नगरसचिव विभाग.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि०३/१२/ 2016

प्रकरण क्र. ९४ // गोषवारा //

**विषय : कर आकारणी न झालेल्या व वापरात बदल झालेल्या मिळकतींची कर आकारणी करणेसाठी अभय योजना (ॲम्नेस्टी स्कीम) जाहीर करणे.**

कर आकारणी न झालेल्या व वापरात बदल झालेल्या मालमत्तांची कर आकारणी करणेसाठी मालमत्ताधारक यांनी स्वत: होउन पुढे येणे आवश्यक आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कराधन नियम 8 अन्वये मालमत्ताधारक यांनी माहिती देणे बंधनकारक आहे. परंतू अशी माहिती दिली जात नाही ही वस्तूस्थिती आहे. कर विभागातील उपलब्ध अधिकारी व कर्मचारी वर्ग विचारात घेता कर आकारणी न झालेल्या व वापरात बदल झालेल्या मालमत्तांची कर आकारणी करणेकामी ज्या मालमत्ताधारकांकडून माहिती कळविली जाईल, त्यांना कर आकारणी केल्या नंतर येणाऱ्या करपात्र रक्कमेच्या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कराधन नियम 8(3) अन्वये 25 टक्के रक्कम प्रशासकीय/विलंब शुल्क म्हणून आकारण्यात येणार नाही. परंतू ज्या मालमत्तादाराकडून अशी माहिती स्वत: न कळविल्यास प्रभाग समितीमधील कर निरीक्षक व विभागिय लिपीक यांनी जागा तपासून पाहणी करून त्याची कर आकारणी केल्यास अथवा मनपाचे वतीने सर्व्हेक्षण केल्यास त्यांना कर आकारणी करण्यात आलेल्या वार्षिक करपात्र रक्कमेच्या 25 टक्के रक्कम ही प्रशासकीय/विलंब शुल्क म्हणून आकारुन कर आकारणी करणेबाबत अभय योजना जाहिर केल्यास कर आकारणी न झालेल्या व वापरात बदल झालेल्या मालमत्ता, कर आकारणीच्या जाळ्यात येतील व महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल.

वरील बाब विचारात घेऊन कर आकारणी न झालेल्या व वापरात बदल झालेल्या मालमत्तांची कर आकारणी करणेसाठी खालील प्रमाणे अभय योजना जाहीर करणेस प्रस्ताव सादर करीत आहे.

1) कर आकारणी न झालेल्या सर्व मालमत्तांची कर आकारणी करणे साठी मालमत्ताधारक यांनी स्वत: अभय योजनेच्या कालावधीत म्हणजेच दि. 15/12/016 ते दि. 14/02/2017 अखेर अर्ज केल्यास त्यांना त्यांचे मालमत्तेची अधिनियमातील तरतुदीनुसार करपात्र रक्कम निश्चित करुन कर आकारणी करणेत येईल तसेच सदर मालमत्ता धारकांना योजना कालावधीतच दि. 14/02/2017 पुर्वीच सदर रक्कमेचा भरणा करावा लागेल अन्यथा सदर मालमत्ता धारकाच्या पुढील आर्थिक वर्षाचे देयकात वार्षिक करपात्र रक्कमेच्या 25 टक्के रक्कम प्रशासकीय/विलंब शुल्क म्हणुन एक वेळेत आकारण्यात येईल.

2) वापरात बदल झालेल्या सर्व मालमत्तांची कर आकारणी करणे साठी मालमत्ताधारक यांनी स्वत: अभय योजनेच्या कालावधीत म्हणजेच दि. 15/12/016 ते दि. 14/02/2017 अखेर अर्ज केल्यास त्यांना त्यांचे मालमत्तेची अधिनियमातील तरतुदीनुसार करपात्र रक्कम निश्चित करुन कर आकारणी करणेत येईल तसेच सदर मालमत्ता धारकांना योजना कालावधीतच दि. 14/02/2017 पुर्वीच सदर रक्कमेचा भरणा करावा लागेल अन्यथा सदर मालमत्ता धारकाच्या पुढील आर्थिक वर्षाचे देयकात वार्षिक करपात्र रक्कमेच्या 25 टक्के रक्कम प्रशासकीय/विलंब शुल्क म्हणुन एक वेळेत आकारण्यात येईल.

3) कर आकारणी न झालेल्या सर्व मालमत्तांची कर आकारणी करणेसाठी मालमत्ताधारक यांनी स्वत: अभय योजनेच्या कालावधीत म्हणजेच दि. 15/12/016 ते 14/02/2017 अखेर अर्ज केलेला नाही अशा मालमत्तांची दि. 15/12/2016 नंतर आकारणी केल्यास सदर मालमत्तेचे

करपात्र रक्कम, अधिनियमातील तरतुदीनुसार निश्चित करुन वार्षिक करपात्र रक्कमेच्या 25 टक्के रक्कम प्रशासकीय/विलंब शुल्क म्हणुन एका वेळेस आकारण्यात येईल व त्यानूसार कर आकारणी करण्यात येईल.

4) वापरात बदल झालेल्या सर्व मालमत्तांची कर आकारणी करणेसाठी मालमत्ताधारक यांनी स्वत: अभय योजनेच्या कालावधीत म्हणजेच दि. 15/12/016 ते 14/02/2017 अखेर अर्ज केलेला नाही अशा मालमत्तांची दि. 15/12/2016 नंतर आकारणी केल्यास सदर मालमत्तेचे करपात्र रक्कम, अधिनियमातील तरतुदीनुसार निश्चित करुन वार्षिक करपात्र रक्कमेच्या 25 टक्के रक्कम प्रशासकीय/विलंब शुल्क म्हणुन एका वेळेस आकारण्यात येईल व त्यानूसार कर आकारणी करण्यात येईल.

प्रस्तूत बाबत वार्षिक करपात्र रक्कमेच्या 25 टक्के ही प्रशासकीय/विलंब शुल्क म्हणुन एक वेळ आकारणी करणे असल्याने वरीलप्रमाणे शुल्काची आकारणी करणेबाबतचा प्रस्ताव मा. महासभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

गोषवारा प्राप्त दि. ०२/१२/१८ वेळ ०५.१५ वा
~~मा. स्थायी~~ / मा. महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. ६४
०५/१२/२०१८
नगरसचिव विभाग.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**बांधकाम विभाग**

**मा. विशेष महासभा दि. ०३/१२/२०१६**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्र. ( ९५ ) :- दहीसर पर्यंत येणाऱ्या मेट्रो रेल्वेचा विस्तार भाईंदर पर्यंत करणेबाबत.**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्राचे नागरीकरण वेगाने होत आहे. शहर मुंबई व ठाणे शहरालगत असून सदर दोन्ही शहरांना जोडण्यासाठी मेट्रो रेल्वेचे प्रकल्प मंजूर करण्यात आलेले आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात पश्चिम बाजूस दहीसर लिंक रोड व पूर्व बाजूस राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ दहीसर पर्यंत मेट्रो चे काम सुरू झाले आहे. तसेच ठाणे महानगरपालिका क्षेत्रात कासारवडवली पर्यंत मेट्रो प्रकल्प मंजूर आहे.

ठाणे कासारवडवली पर्यंत येणारी मेट्रो घोडबंदर मार्गे दहीसर पर्यंत जोडण्याचा प्रस्ताव मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पांतर्गत घोडबंदर वर्सोवा पूल व काशिमिरा येथे स्थानके उभारणे शक्य होईल. मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातून भाईंदर पश्चिम बाजूस दहीसर लिंक रस्त्यास जोडणारा रेल्वे समांतर रस्ता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मंजूर करण्यात आला असून सल्लागार नेमण्याची प्रक्रीया सुरू आहे. दहीसर लिंक रस्ता मिरारोड - भाईंदर सुभाषचंद्र बोस मैदान व पुढे नायगाव, वसई विरार पर्यंत जाणार आहे. सदर रस्त्यावरून दहीसर पश्चिमेस येणारी मेट्रो मिरारोड व भाईंदर पर्यंत आणणे शक्य आहे.

तरी मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत सदर मेट्रो प्रकल्प मिरारोड व भाईंदर पर्यंत विस्तारीत करण्यासाठी मा. महासभेचा निर्णय होण्यास शिफारस आहे.

**आयुक्त**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

PC-6/DK/2016-17 MG-13

गोषवारा प्राप्त दि. १९/१०/२०१६ वेळ ०३:३० वा.

~~मा. स्थायी समिती~~ / गोषवारा

नोंद रजिस्टर अ. क्र. ५७

लिपीक १९/१०/२०१६

नगरसचिव विभाग.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. विशेष महासभा - ०३/१२/२०१८**

**//गोषवारा//**

**प्रकरण क्रमांक ( ९६ ) :-** रस्ते. चौक, उद्याने व इतर वास्तुंना नावे देण्याबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील रस्ते. चौक, उद्याने व इतर वास्तुंना नावे देण्याकरीता सन्मानीय नगरसेवक / नगरसेविका यांना पत्र देऊन प्रस्ताव मागविण्यास आले होते. त्यांच्याकडुन प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. यापुर्वी झालेले नामकरण वगळात खालील प्रस्ताव सादर करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | ठिकाणाचे नाव | प्रस्तावित नाव |
|---|---|---|
| १ | मिरारोड (पुर्व) प्रभाग क्र. ४५ महाजनवाडी, पेणकरपाडा येथील रॉयल कॉलेज ते एम.आय.डी.सी. डेल्टा संकुल येथील चौक | छत्रपती शिवाजी महाराज चौक |
| २ | मिरा रोड (पूर्व) प्रभाग क्र. ४५ पांडुरंग वाडी ते पेणकरपाडा या डी. पी. रस्त्यावरील कक्कड पॅराडाईज संकुल जवळील चौक | कै. पद्माकर मन्या म्हात्रे चौक |
| ३ | भाईंदर (प.) प्रभाग क्र. २८ मधील मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शॉपिंग सेंटर वरील सभागृहास | स्व. जर्नादन नारायण रकवी सभागृह |
| ४ | मिरा रोड (पूर्व) शांती पार्क हैप्पी होम अपार्टमेंट क्र. ०१ व ०२ चे मागील बाजूस असलेले उद्यान | हर्षदभाई पूनमचंद दोशी उद्यान |
| ५ | भाईंदर (प.) मोर्वा गावातील व्यायाम शाळा | स्व. मनोहर हरिश्चंद्र पाटील व्यायामशाळा |
| ६ | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. १७ मधील मथुरा सदन, मथुरा धाम ते मथुरा कुंज रस्ता | कै. मथुराबाई केशव पाटील मार्ग |
| ७ | भाईंदर (पूर्व) स्टेशन समोरील चौक | हुतात्मा चौक |
| ८ | मिरा रोड प्रभाग क्र. ५ या परिसरात धरती कॉम्पलेक्स नर्मदा पॅराडाईज या इमारतीमधील चौक | गणेश मंदिर चौक |
| ९ | मिरा रोड प्रभाग क्र. ५ मध्ये आर. के. इन या हॉटेलकडे जाणारा रस्ता | श्रीमती नर्मदा महादेव कदम मार्ग |
| १० | मिरा रोड (पूर्व) रामदेव पार्क येथील शाखा क्र. ३१ जवळील चौक | डॉ.ए.पी.जे.अब्दूल कलाम चौक/ सावित्रीबाई फुले चौक |
| ११ | मिरा रोड (पुर्व) प्रभाग क्र. ३१ दिपक हॉस्पीटल लेन, सेवन स्वेक्अर शाळेच्या बाजूचा रस्ता | परमपुज्य श्री. माताजी निर्मला देवी मार्ग |
| १२ | मिरा रोड (पुर्व) प्रभाग क्र. ३१ बाळासाहेब ठाकरे मैदान जवळील एस.के.इंग्लीश हार्ड स्कुल व दुर्गा रेसिडेन्सी सरवाल चौक | अजमालुल वल्मा चौक |
| १३ | भाईंदर (प.) राधेश्याम रेसिडेन्सी ते दर्शना हाईटस परिसराचा रस्ता | श्री रामप्रसाद अग्रवाल (कंदोई) मार्ग |
| १४ | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र.१२ मधील नवघर रोड येथील लताकुंज गल्ली हा रस्ता | कै. लता रामचंद्र पाटील मार्ग |
| १५ | मिरारोड (पुर्व) सेक्टर क्र. ६ येथील कम्युनिटी हॉल | गुरु भगवंत आचार्य रती लालजी महाराज साहेब सभागृह |
| १६ | राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ एम.आय.डी.सी. चौक | अशोक सिंघल चौक |

| | | |
|---|---|---|
| १६ | छत्रपती शिवाजी मार्गापासुन विनय नगर, पुजा पार्क, सिल्वर सरिता कॉम्पलेक्स कडुन जाणारा रस्ता | गावदेव विठ्ठल मंदिर मार्ग |
| १७ | भाईंदर (पुर्व) संजोली गोल्ड ते श्रीराम मंदिर (गोल्डन नेस्ट रस्ता) | स्व. विनोद (दादा) सावंत मार्ग. |
| १८ | मिरारोड (पुर्व) सिल्वर क्राऊन बिल्डिंगला चौक | लक्ष्मण सोमाजी चक्रे चौक/ धर्मवीर आनंद दिघे चौक |
| १९ | मिरारोड (पुर्व) संघवी नगर या खेळाचे मैदान (आरक्षण क्र. ३२८, शाळा व खेळाचे मैदान) | वंदना रामदास चक्रे मैदान/ सरदार वल्लभभाई पटेल मैदान |
| २० | मिरारोड (पुर्व) अमर प्लाझा हॉल समोर ओम वसुंधरा, निल वसुंधरा या सर्कल | वंदना रामदास चक्रे चौक/ गुरु गौतम स्वामी चौक |
| २१ | मिरारोड (पुर्व) प्रभाग क्र.३० लोधा कॉम्पलेक्स येथील सर्कल | हजरत टिपु सुलतान चौक |
| २२ | भाईंदर (पुर्व) आरक्षण क्र. २४२ उद्यान | श्री. जगवल्लभ सुरीश्वरजी महाराज उद्यान |
| २३ | मिरारोड (पूर्व) पुनमसागर कॉम्पलेक्सच्या मागील मैदान | सच्चीदानंद माधवानंद मैदान |
| २४ | राई मंदिर तलावाच्या टिकाणी नविन बांधलेले डेक (Viewing Gallery) | परपूज्य पार्वतीमाता डेक |

वरील नामकरण प्रस्तावाबाबत विचार विनिमय करुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची 'ड' मधील प्रकरण ११ (२) अन्वये मान्यता देण्यास शिफारस आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-3/KD/2016-17 /MG -7

गोषवारा प्राप्त दि. २८/१७/२० १६ वेळ १२
मा. स्थायी समिती / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. ५०
दिनांक २८/१/१६
नगरसचिव विभाग.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## परवाना विभाग

## विशेष मा. महासभा दि. ०३ /१२/२०१६

## // गोषवारा //

**प्रकरण क्र.** :- ९८ टेलिफोन बुथ, गटई स्टॉल यांचे धोरण ठरविणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत परवाना विभागाकडून, महापालिका क्षेत्रात रस्ते / गटारावर एकूण २९३ स्टॉल परवाने देण्यात आले असून ते खालीलप्रमाणे आहेत.

१) अरे सरीता / महानंदा - १३७

२) अपंग टेलिफोन बुथ – १०९

३) गटई स्टॉल – ५०

त्यापैकी अनेक स्टॉल स्थलांतरीत झाले आहेत. मंजूर क्षेत्रापेक्षा जास्त क्षेत्राचे स्टॉल लावण्यात आले आहेत. त्यामुळे प्रभाग निहाय सर्व स्टॉलचे सर्वेक्षण करणेबाबत सद्यस्थिती तपासणी आवश्यक आहे. परवाना विभागात मोठ्या प्रमाणात अपंग, गटईचे स्टॉल देणेबाबत सातत्याने नविन अर्ज प्राप्त होत आहेत. परंतु आलेल्या अर्जाप्रमाणे विहित कार्यवाही करुन परवाना दिल्यास रस्ते, फुटपाथवर अनेक स्टॉल दिसून येतील. स्टॉल परवाना देणेबाबत धोरण निश्चित करणे आवश्यक आहे. तसेच यापूर्वीच्या अटीशर्ती कायम ठेवून रहदारी व स्थानिक परिस्थितीचा विचार करुन खालीलप्रमाणे उपाययोजना करुन निर्णय घेणे उचित वाटते.

- नविन स्टॉल हे फक्त अपंग व गटई धारकांसाठी असावे.
- स्टॉलधारक व्यक्ती मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील कमीत कमी १५ वर्षापासून रहिवासी असणे आवश्यक आहे.
- प्रभाग निहाय स्टॉलची संख्या, त्या प्रभागांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात असावी. जागा निश्चिती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करणे व त्यानुसार सर्वप्रथम ज्यांना परवाना यापूर्वी देण्यात आला आहे, त्यांना स्टॉल देणे व उर्वरित स्टॉल परवान्यांसाठी नविन अर्ज स्विकारणे तसेच ज्या प्रभागात मागणी नाही त्या प्रभागात मा. आयुक्त सो. यांचे मान्यतेने स्टॉल परवाना दिला जाईल. एकदा जागा निश्चित झालेनंतर केवळ त्याच जागेवर स्टॉल परवाना दिला जाईल. अर्जदार त्याच वॉर्डमधील असावा. जर अर्ज जास्त असेल तर लॉटरी पध्दतीने स्टॉल दिले जातील.
- प्रभाग निहाय जागा निश्चिती झालेनंतर दर ५ वर्षांनी त्याबाबत आढावा घ्यावा.
- स्टॉलचा वापर योग्य रितीने व नियम, अटीशर्ती प्रमाणे होत असल्याची तपासणी दरवर्षी बांधकाम / W.O./(J.E.) मार्फत होईल. स्टॉलधारकाने नुतनीकरण करताना मागील ३ वर्षात त्याने नियम / अटींचा भंग केला नाही असे प्रमाणपत्र संबंधित W.O./J.E. (बांध) यांचे मार्फत सादर करणे बंधनकारक राहील. रस्ता रुंदीकरणात जे स्टॉल तोडण्यात आले आहे त्यांना सार्वजनिक बांधकाम विभागाने सूचविल्याप्रमाणे अन्य ठिकाणी पुर्नस्थापना करणे.
- अनुज्ञेय व्यतिरिक्त अन्य वापर चालु असल्यास, स्टॉल परवाना रद्द करणे, एकदा स्टॉल दिल्यावर सदर स्टॉल ५ वर्षासाठी परवाना देणे त्यानंतर नुतनीकरणबाबत फेरतपासणी

करणे हयात आहे, वापर आहे का? इ. बाबत तपासणी करणे व अटीशर्तींचे उल्लंघन केल्यास स्टॉलधारकाचा परवाना रद्द होईल.

- ज्या व्यक्तीसाठी व ज्या कारणासाठी स्टॉल दिला आहे त्याचा वापर न केल्यास भाड्याने दिल्यास, अतिरिक्त वाढीव बांधकाम केल्यास, छपरा टाकल्यास स्टॉलधारकावर जप्ती व गुन्हा दाखल करण्यात येईल, व ज्याने भाड्याने घेतला असेल त्याचेवरही गुन्हा दाखल करावा. स्टॉलसंबंधी तक्रार प्राप्त झाल्यास स्टॉल निलंबन करुन रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल.
- एका कुटुंबातील एकाच व्यक्तीस स्टॉल देणे बंधनकारक राहील व स्टॉल धारकाकडून कुटुंबातील कोणत्याही सदस्याकडे एकापेक्षा जास्त स्टॉल असल्यास संबंधितांवर कारवाई करणेस हरकत नाही असा करारनामा स्टॉलधारक यांचेकडून लिहून घेण्यात येईल.
- अपंगाना स्टॉल अपंग दाखल्याच्या गुणवत्तेनुसार देता येईल.
- आरे सरीता किंवा महानंदा दुध स्टॉल यांना दिलेल्या स्टॉलचे फक्त नुतनीकरण करता येईल.
- प्रभाग अधिकारी व वाहतूक पोलीस निरिक्षक यांच्या स्टॉल जागेसंबंधीचा अभिप्राय अहवालनुसार पुढील कार्यवाही केली जाईल.

तरी अपंगांना टेलिफोन बुथ व गटई स्टॉलबाबत परवाना देणेकरीता विचार विनिमय करुन धोरणात्मक निर्णय घेणेकामी मा. महासभेत धोरण निश्चित होणेस शिफारस आहे.

**(डॉ. नरेश गिते)**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

गोषवारा प्राप्त दि. २४/११/२०१८ वेळ ९.१०
मा. ~~स्थायी समिती~~ / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. ६०
दिनांक २४/११/१८
नगरसचिव विभाग.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. विशेष महासभा दि. 03/12/2016
//गोषवारा//

**प्रकरण क्र.** ( ९८ ) :- विशेष निधी अंतर्गत विविध कामांना मान्यता देणे.

नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2015/प्रक्र.80/नवि-16 दि.8 मार्च 2016 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेस रु.10 कोटी एवढा विशेष निधी शासनाकडून मंजूर करण्यात आला असून त्यामध्ये महानगरपालिकेस रु.10 कोटी एवढी रककम लावून एकूण रु. 20 कोटी रकमेचे प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी मा. विभागीय आयुक्त, कोंकण विभाग यांच्या समितीपुढे सादर करावयाचे होते. मा. महासभा दि.28/06/2016 ठराव क्र. 24 अन्वये रु. 20 कोटी रकमेच्या 09 कामांना मा. महासभेने मान्यता दिल्यानूसार सदर कामे प्रशासकीय मान्यतेसाठी मा. विभागीय आयुक्त कोंकण विभाग यांच्या समितीपुढे सादर करण्यात आली होती. तथापी शासन निर्णयानूसार सदर कामे दि. 31 मार्च 2017 पर्यंत पूर्ण करावयाची असल्याने व इमारती विषयक कामांचे नकाशे मंजूर करणे व प्रत्यक्षात नविदा मागवून कामे पूर्ण करण्यास विलंब होणार असल्याने इमारती विषयक रु.3.00 कोटी रकमेची 04 कामे अंतिम मान्यतेसाठी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात आलेली नाहीत. उर्वरीत रु.17 कोटी रकमेच्या 05 कामांना प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. इमारती विषयक रु. 3 कोटी रकमेच्या कामा ऐवजी विशेष निधीतून खालील कामे प्रस्तावित करण्यात येत आहेत.

1) मिरारोड (पूर्व) प्रभाग क्र.31 मधील विकास योजनेतील रस्ते व रस्त्यालगत गटारे बांधणे .- रु.2,358,36,200/-
2) भाईंदर (पूर्व) नवघर रोड लगत एस.व्ही. रोडचे पूर्णपृष्ठीकरण करणे. - रु.41,63,800/-

वरील कामांना मान्यता देण्यास शिफारस आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-3/KD/2016-17 /MG -8

गोषवारा प्राप्त दि ९ /१२/२०१६ वेळ १२:७५

मा. स्थायी समिती / महासभा गोषवारा

नोंद रजिस्टर अ. क्र. ६१

लिपिक ९/१२/१६

नगरसचिव विभाग.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि.०३/१२/२०१६
विशेष
सार्व. आरोग्य विभाग

// गोषवारा //

प्रकरण क्र. :- ९९ घनकचरा प्रकल्प संदर्भात मा. नॅशनल ग्रीन ट्रिब्युनल (NGT) पुणे न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार रु. ७० कोटी मा. विभागीय आयुक्तांकडे जमा करणेबाबत निर्णय घेणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे उत्तन-पाली येथे बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर माहे मे, २००८ मध्ये घनकचरा प्रक्रिया प्रकल्प सुरु करण्यात आला होता. परंतू सदरचा प्रकल्प दि.२५/१०/२०१३ पासून काही तांत्रिक कारणांमुळे बंद झाला आहे.

मौजे उत्तन येथील घनकचरा प्रकल्पाबाबत नागरीक हक्क संघर्ष समिती, पो. उत्तन यांनी मा. नॅशनल ग्रीन ट्रिब्युनल, पुणे (पश्चिम विभाग) येथे महानगरपालिका विरोधात अर्ज क्र. ६५/२०१५ दाखल केली. दि.२१/७/२०१५ रोजी मा. ट्रिब्युनल यांनी महानगरपालिकेस कोकण विभागीय आयुक्त यांचेकडे रु. ७०.०० कोटी इतकी रक्कम एस्क्रो अकाऊंट उघडून ०४ आठवड्यांत जमा करणेस व मौजे उत्तन येथे टाकण्यात येणाऱ्या घनकचऱ्यावर प्रक्रिया करण्याचा प्रकल्प (Stop Gap Arrangement) सुरु करणेस आदेशित केले होते.

महानगरपालिकेने सदर आदेशा विरोधात मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. ८४४५/२०१५ दाखल केली होती. मा. उच्च न्यायालयाने दि.२६/०८/२०१५ रोजी मा. ट्रिब्युनल यांनी रु. ७०.०० कोटी इतकी रक्कम एस्क्रो अकाऊंट उघडून जमा करणेसाठी दिलेल्या आदेशास स्थगिती दिली होती. तद्नंतर मा. ट्रिब्युनल यांनी दि. २७/१०/२०१५ रोजी पुन्हा रु. ७०.०० कोटी भरणेबाबत (मा. उच्च न्यायालयाकडून स्पष्टीकरण घेतल्यानंतर) महानगरपालिकेस आदेशित केले होते. सदर आदेशा विरुध्द महानगरपालिकेने रिट याचिका क्र. ८४४५/२०१५ यात Civil Application 3184/2015 दाखल केले असता, मा. उच्च न्यायालयाने दि. ७/१२/२०१५ रोजीच्या आदेशान्वये मा. ट्रिब्युनल येथे दाखल असलेल्या Application ची प्रोसिडींगला स्थगिती देण्यात आली.

दरम्यान महानगरपालिकेने मा. ट्रिब्युनल यांनी दिलेल्या आदेशानुसार आय.आय.टी., मुंबई यांची मौजे उत्तन येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणी करणे कामी तांत्रिक सल्लागार म्हणून नेमणुक केली आहे. आय.आय.टी., मुंबई यांचेकडून दि. ११/०३/२०१६ रोजी प्राप्त झालेल्या तांत्रिक सल्ल्यानुसार महानगरपालिकेने मौजे उत्तन येथील जागेवर घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणी करणे करीता पुढीलप्रमाणे निविदा मागविण्यात आल्या.

तद्नंतर आय.आय.टी., मुंबई यांनी निविदा अंतिम केल्यानंतर बांधा, वापरा व हस्तांतरीत करा (BOT) या तत्वावर दि. २७/०५/२०१६ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदेस प्रतिसाद न मिळाल्याने दि.०६/०७/२०१६ व दि. ०५/०८/०१६ रोजी मुदतवाढ देण्यात आली होती. सदर निविदेस प्रतिसाद न मिळाल्याने दि.२०/०९/२०१६ रोजी फेर निविदा मागविण्यात आली होती. यांसही प्रतिसाद न मिळाल्याने दि.११/११/२०१६ रोजी फेर निविदा मागविण्यात आली आहे.

दरम्यानच्या काळात मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.२१/९/२०१६ रोजी मा. ट्रिब्युनल येथे दाखल असलेल्या Application वरील स्थगिती उठवून सदर केसची प्रोसिडींग पुढे चालू ठेवता येईल व त्या दरम्यान रु.७०.०० कोटी रक्कम भरणा करण्याबाबतच्या आदेशास दिलेली स्थगिती दि. ३०/११/२०१६ पर्यंत वाढवून दिली आणि महानगरपालिकेस मा. ट्रिब्युनल यांनी पारीत केलेल्या आदेशा विरुध्द मा. सर्वोच्च न्यायालय किंवा मा.ट्रिब्युनलकडे जाता येईल, असे निर्देशित करून

महानगरपालिकेने दाखल केलेली रिट याचिका क्र. ८४४५/२०१५ व Civil Application 3184/2015 निकाली काढलेली आहे.

वरीलप्रमाणे मा. उच्च न्यायालयाने महानगरपालिकेस निर्देशित केल्यानुसार रु. ७०.०० कोटी रक्कम भरणा करण्याबाबतच्या आदेशास स्थगिती मिळण्याकरीता महानगरपालिकेच्या वतीने मा.ट्रिब्युनल Misc. Application 363/2016 दाखल करण्यात आली. सदर अर्जात महानगरपालिकेची रु.७०.०० कोटी इतकी रक्कम भरणा करण्याबाबत आर्थिक परिस्थिती नसल्याचे मा. ट्रिब्युनल यांच्या निदर्शनास आणुन दिले. सदर अर्जावर दि.२१/११/२०१६ रोजी मा. ट्रिब्युनल यांचेकडे सुनावणी झाली असता, मा. ट्रिब्युनल यांनी यापुर्वी पारीत केलेल्या आदेशाची पुर्तता करण्यासाठी महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती नसल्याबाबतचा मा.महासभेचा ठराव करून सादर करणेस आणि आयुक्त व उप-आयुक्त (आरोग्य) यांना आदेशाची पुर्तता केल्याबाबत शपथपत्र दि. १४/१२/२०१६ रोजी दाखल करणेस आदेशित केलेले आहे.

महानगरपालिका सांविधिक कर्तव्य (Obligatory duties) म्हणुन घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत दैनंदिन साफसफाई करणे, घरोघरी जाऊन कचरा गोळा करणे, गोळा केलेला कचरा प्रकल्प ठिकाणी वाहतुक करणे इत्यादी करीता महानगरपालिका वार्षीक रु. ७०.०० कोटी खर्च करीत आहे. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे महानगरपालिकेतर्फे बांधा, वापरा व हस्तांतरीत करावा या तत्वावर घनकचरा प्रक्रियेसाठी निविदा काढलेली आहे. त्यामुळे सदर प्रकल्प उभारणीसाठी महानगरपालिकेस कोणत्याही प्रकारची भांडवली गुंतवणुक करावी लागणार नाही. तथापी, प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर महानगरपालिका टिपिंग फि देणार आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेची सन २०१५-१६ ची महसुली व खर्चाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| महानगरपालिकेचे एकुण महसुली उत्पन्न | रु. ४५८.५३ कोटी |
| भांडवली जमा | रु. १.६५ कोटी |
| **एकुण** | **रु. ४६०.१८ कोटी** |

| | |
|---|---|
| महानगरपालिकेचे एकुण महसुली खर्च | रु. ३२२.६३ कोटी |
| भांडवली खर्च | रु. १३७.०१ कोटी |
| **एकुण** | **रु. ४५९.६४ कोटी** |

**आवश्यक खर्च :- १) अत्यावश्यक होणारा वार्षिक खर्च** :- रु. २५८.०० कोटी (कर्मचारी वेतन, पाणी बिल, लाईट बिल, वॉर्ड साफसफाई, शिक्षण मंडळ वेतन, वाहन इंधन, कर्ज परतफेड इत्यादी)

**२) महानगरपालिकेवर असलेले दायीत्व (कर्जाची सद्यस्थिती)** :- रु. २१७.५० कोटी आहे.

महानगरपालिकेची उपरोक्त आर्थिक स्थिती पाहता मा. ट्रिब्युनल यांच्या आदेशानुसार रु.७०.०० कोटी जमा करणे आर्थिक दृष्ट्या शक्य होणार नाही. सदरची वस्तुस्थिती मा. ट्रिब्युनल यांना कळविण्यास शिफारस आहे.

(डॉ. नरेश गिते)
**आयुक्त,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

गोषवारा प्राप्त दि.१ /१२/२०१६ वेळ १२.२०
मा. स्थायी ... / ... गोषवारा
नोंद रजिस्टर ... 62
... सचिव विभाग.
१/१२/१६
१२.२०